**ठळक बातम्या**

- उत्कृष्ट दर्जाच्या चित्रीकरणासाठी राज्यात २ अत्याधुनिक स्टुडियो उभारण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा/ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते निफ्टी वेव्हज् इंडेक्सचं उद्घाटन

- किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास

- ज्येष्ठ नागरिक हे कुटुंबातले महत्वाचे घटक तसंच कुटुंबियांचे भावनिक आधारस्तंभ असतात, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

**आणि**

- अहिल्यानगरचे माजी आमदार अरुण जगताप यांचं निधन

**<><><><><><>**

चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी महाराष्ट्रात दोन अत्याधुनिक स्टुडिओ उभारले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मुंबईत सुरू असलेल्या वेव्हज् परिषदेत भारत पेव्हेलियनला मुख्यमंत्र्यांनी आज भेट दिली, त्यावेळी त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. या दोन स्टुडिओच्या उभारणीसाठी प्राईम फोकस आणि गोदरेजसोबत सामंजस्य करार केले आहेत. या स्टुडिओंमधे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रीकरण करता येणार आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गोदरेजच्या सहाय्याने पनवेल मधे दोन हजार एकर जागेवर चित्रनगरी उभारली जाणार असून यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असल्याचंही ते म्हणाले.

आता चित्रनगरी उभारण्यासाठी जागेची नाही तर तंत्रज्ञानाची गरज आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले....

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (१.५० ते २.१४)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राष्ट्रीय शेअर बाजाराच्या Nifty Waves Index चं उद्घाटन केलं. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातल्या ४३ कंपन्याच्या समभागांचा समावेश या निर्देशांकात आहे.

<><><><><><>

वेव्हज अर्थात जागतिक दृकश्राव्य शिखर परिषदेत दुसऱ्या दिवशी आज जागतिक माध्यम संवाद कार्यक्रमाचं आयोजनही आज करण्यात आलं. तंत्रज्ञान आणि परंपरा हातात हात घालून जायला हव्यात असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर या सत्राचं उद्घाटन करताना म्हणाले. तंत्रज्ञानामुळे तरुण पिढीचा अनुभव समृद्ध होतो, विकसित भारताच्या निर्मितीसाठी नवोन्मेष आवश्यक आहे, असं त्यांनी सांगितलं. संस्कृती सर्जनशीलतेला प्रेरित करते असं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. संस्कृतीच्या वैविध्याला आपण पाठिंबा द्यायला हवा, असंही ते म्हणाले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यावेळी उपस्थित होते.

**भारत-**अमेरिका सर्जनशीलता परिसंस्थेला चालना देण्यासाठी वेव्हज् परिषदेत सत्र आयोजित करण्यात आलं. अमेरिकेचे काऊन्सलर माईक हँकी यांनी या सत्राचं उद्घाटन केलं आणि उपस्थितांना संबोधित केलं.

**भारताने** आपलं तत्त्वज्ञान, ज्ञान आणि शिकवणीच्या आधारे जगाच्या ज्ञानात भर टाकली, असं उद्योजक **निता अंबानी** म्हणाल्या. त्या वेव्हज् परिषदेत एका चर्चासत्राला संबोधित करत होत्या. भाषा, साहित्य, संगीत आणि वैद्यकीय ज्ञान अशा सर्वच क्षेत्रात भारतानं जगाला भरीव योगदान दिलं आहे, असं त्या म्हणाल्या.

<><><><><><>

नाशिक शहरात आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या ५० दिवसांच्या उलटगणनेनिमित्त योग महोत्सव घेण्यात आला. पंचवटीत रामकुंड परिसरातल्या गौरी मैदान इथं सामूहिक योग प्रात्यक्षिकांनी योग महोत्सवाची सुरुवात झाली.

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर, योग अभ्यासक आणि नागरिक यावेळी उपस्थित होते. ११वा योग दिवस देशात एक लाख ठिकाणी साजरा होईल, यादृष्टीनं नियोजन करण्यात आलं असून, त्यासाठी योगसंगम ॲप तयार करण्यात आलं असून, त्यात नोंदणी करून योगसाधना करता येईल, अशी माहिती जाधव यांनी यावेळी दिली.

**बाईट: केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव**

मुलं आणि महिलांनी कोणती आसनं करावी, तसंच आजार निहाय कोणत्या प्रकारचे योगासनं उपयुक्त ठरू शकतात याचे पॅकेजेस लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं जाधव यांनी सांगितलं.

पुणे जिल्ह्यात लोणावळा इथल्या कैवल्यधाम योग संस्थेमध्ये दोन दिवसांच्या राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचं उद्घाटन केंद्रीय आयुष राज्य मंत्र्यांच्या हस्ते काल झालं. आयुष औषध केंद्र तहसील स्तरावर उघडण्यात येणार आहेत. यामुळे आयुष उपचारपद्धतीची सर्व औषधं एकाच ठिकाणी वाजवी दरात उपलब्ध होतील असंही जाधव यावेळी म्हणाले. आयुष मंत्रालयाच्या वाढत्या लोकप्रियतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><><><>**

किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. केरळात तिरुवअनंतपुरम मध्ये विळींजम इथं खोल पाण्यातल्या आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं उद्घाटन आणि लोकार्पण आज मोदी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आतापर्यंत भारतातली ७५ टक्के समुद्र मार्गाने होणारी आयात ही परदेशातल्या बंदरांवर होत होती. ही सर्व प्रक्रिया अत्यंत खर्चिक होती. आता मात्र, या विळिंजममुळे हा खर्च वाचणार असून त्याचा उपयोग

केरळवासियांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी होईल, असंही मोदी यावेळी म्हणाले. या सोहळ्याला केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. हे बंदर आठ हजार ८०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलं असून नजीकच्या भविष्यात त्याची मालहस्तांतरण क्षमता तिप्पट होणार आहे. हे बंदर देशातलं पहिलं अर्धस्वयंचलित बंदर ठरणार आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आंध्र प्रदेशच्या दौऱ्यावरही जाणार असून, अमरावती इथं त्यांच्या हस्ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांची पायाभरणी होणार आहे. देशभरात जागतिक दर्जाची संरचना आणि संपर्क जाळे उभारण्याची वचनपूर्तीचा भाग म्हणून आंध्र प्रदेशातल्या सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. तसंच सहा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प आणि एका रेल्वे प्रकल्पाची पायाभरणीही ते करतील. या विकास कामांमध्ये विधानभवन, उच्च न्यायालय, सचिवालय आणि इतर प्रशासकीय इमारती तसंच रहिवासी इमारती तसंच एकता मॉल यांचा समावेश आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते चौदाशे कोटी रुपये खर्चाच्या क्षेपणास्त्र चाचणीतळाची पायाभरणी करण्यात येणार आहे.

**<><><><><><>**

ज्येष्ठ नागरिक हे कुटुंबातले महत्वाचे घटक तसंच कुटुंबियांचे भावनिक आधारस्तंभ असतात, ज्येष्ठ नागरिकांनी केलेलं मार्गदर्शन समाजासाठीही महत्वाचं असतं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रपती भवनात आयोजित एका ज्येष्ठ नागरिक सोहळ्यादरम्यान म्हणाल्या. या सोहळ्याला उपस्थित असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राष्ट्रपतींनी राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत काही उपयुक्त साहित्य भेट म्हणून दिलं. ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, आरोग्य तसंच राहणीमानाचा दर्जा

उंचावण्यासाठी केंद्र सरकारनं केलेल्या उपाय-योजनांबाबत राष्ट्रपतींनी आनंद व्यक्त केला.

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार, तसंच राज्यमंत्री रामदास आठवले आणि बी. एल. वर्मा कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><><>**

नुकत्याच संपलेल्या एप्रिल महिन्यात एकूण जीएसटी संकलन दोन लाख ३६ हजार कोटी इतकं झालं असून, ते गेल्या एप्रिल महिन्याच्या दोन लाख १० हजार कोटी संकलनाच्या तुलनेत १२ पूर्णांक सहा दशांश टक्क्यांनी अधिक आहे. एप्रिल २०२५ मध्ये निव्वळ जीएसटी संकलन दोन लाख नऊ हजार कोटींपर्यंत पोहोचलं. ही आकडेवारी भारतीय अर्थव्यवस्थेची दृढता आणि सहकारी संघराज्यवादाची कार्यक्षमता स्पष्ट करते, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज, गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातला सामना अहमदाबाद इथं होणार आहे. सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

जयपूरमधे काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सनं दिलेल्या २१८ धावांच्या उद्दिष्टाचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा डाव ११७ धावांवर आटोपला. या विजयासह १४ गुण मिळवून मुंबई इंडियन्सचा संघ गुणतालिकेत अग्रस्थानी पोहोचला आहे.

**<><><><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी संसदेच्या प्राक्कलन समितीच्या अध्यक्षपदी भाजपा खासदार संजय जयस्वाल यांची नेमणूक केली आहे. ३० सदस्यांच्या या समितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत

यांचा समावेश आहे. ही समिती शासकीय खर्चाचे अंदाज आणि विनिमयावर देखरेख ठेवते. सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्षपदी भाजपा खासदार बैजयंत पांडा यांची नेमणूक केली आहे. या समितीत २२ सदस्य आहेत.

<><><><><><>

अहिल्यानगरचे माजी आमदार अरुण जगताप यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं, ते ६७ वर्षांचे होते. जगताप यांनी तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष अशी अनेक महत्वाची पदं भूषवली. या पदांसह ते दोन वेळा काँग्रेसकडून विधान परिषदेवर निवडून आले होते. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही सलग दोनवेळा स्थानिक स्वराज्य संस्थामतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेले होते.

<><><><><><>

भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवस उष्णतेची लाट येण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं महाराष्ट्रासह ११ राज्यांना तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

//<><><><><><>//